औ

[औ ने प्रारंभ होणारे काही शब्द येथे न आढळल्यास 'अउ–ऊ', 'आउ–ऊ', 'अव–आव्' मध्ये पाहावेत.]

औ मराठी अक्षरमालेतील पंधरावे अक्षर. आघातयुक्त 'आ'चा, नंतर येणाऱ्या आघातरहित 'उ'शी संयोग होऊन झालेला संयुक्त स्वर. आघातरहित स्वर व्यंजनाकडे झुकत असल्यामुळे उच्चारदृष्ट्या 'अव्' असा. कित्येक शब्दांत तसे पर्यायी लेखनही जसे :– लौकर–लवकर, चौदा–चवदा, इ. 'ओ' वर एक मात्रा देऊन हे अक्षर काढतात.

औक न. आयुष्य :'औक चितीती पुरविता' – जसा ७ [सं. आयुष]

औकत स्त्री. सामर्थ्य; शक्ती; पात्रता. [फा. औकात]

औकात, औकाद पु. स्त्री १. गुजारा; चरितार्थ : 'एणेकरून आपला औकात चालत नाहीं.' – मइसा १८.४८. २. निर्वाहसाधन :'त्यांचा योगक्षेम चालवयाची काही औकात नाही.' – मइसा १७.३९. पहा : **अवकाळ** [फा.]

औकाफ पु. अव. मुसलमानी धार्मिक संस्था; मुसलमानी धर्मादाय संपत्ती; मुसलमानी देवस्थानांची मालमत्ता. [फा. वक्फ]

औकाळ, औकाळी पहा : **औकात, औकाद**

औगत स्त्री. प्रसूतीनंतरच्या पहिल्या दहा दिवसांत मृत झालेली बाळंतीण. ही सामान्यत: पिशाच होते अशी समजूत आहे. [सं. अव किंवा आ+गत]

औगात, औघात क्रिवि. १. अकस्मात; एकाएकी. (क्रि. येणे, ओढवणे.) २. अल्लाद; न लागता. (ओलांडून जाणे, उडी मारणे). (कु.) [सं. अव +घात]

औचाट वि. अवजड (ओझे); कठीण (काम); न समजणारे (भाषण).

औचित वि. उचित; योग्य :'औचिता करौनि धरा। मग लेखा येईल ।।' – शिव ६९६. [सं. उचित]

औचिता वि. हळवे; लवकर पिकणारे (भात).(चि.)

औचित्य न. १. युक्तता; योग्यपणा; उचितपणा; शोभण्यासारखे असणे; एखादी गोष्ट करताना स्थल, काल व परिस्थिती यांच्याकडे लक्ष देण्याचा गुण. २. (सास.) साहित्याच्या विविध घटकांमधील सद्‌भिरुचीला धरून असणारा गुण. [सं.]

औचित्यपूर्ण वि. प्रसंगाला धरून असलेला; प्रसंगाला योग्य असा.

औचित्यभंग पु. प्रसंगाला न शोभेल असे वर्तन; औचित्याला सोडून वागणे; अनुचित वर्तन.

औजसद्रव्य न. अल्ब्युमिन; एक पौष्टिक द्रव्य. [सं.]

औजाफलक पु. (मानस.) अंक, अक्षर आणि होय व नाही हे शब्द लिहिलेला किंवा छापलेला फलक. त्यावर व्यक्तीने एक अग्रिका फक्त धरून ठेवायची. ती कोणत्या तरी दैवी शक्तीने फिरते किंवा हलते असे समजण्यात येते. प्लंचेटचा फलक.

औजार न. शीड इ. पहा : **अवजार** [फा.]

औज्ज्वल्य न. उज्ज्वलता; चकचकीतपणा; तेज; चमक; झळाळी. [सं.]

औट वि. १. साडेतीन :'औट हात तुझी जागा। येर सिणसी वाऊगा।' – तुगा २६९२. २. (योग) साडेतीन (मात्रा) :'तैशी ते कुंडलिनी। मोटकी औट वळणी।' – ज्ञा ६.२२३. [सं. अर्धसप्त]

औट पु. तोरा; गुर्मी :'वरकडाशी जसे औट धरून करितात तसें तुम्हांशीं करितात.' – ऐलेसं १०२.

औट पु. जळाऊ लाकडांचा किंवा इमारती लाकडांचा ढीग, रास; पाण्याने भिजू नयेत म्हणून घराभोवती पाख्याखाली रचून ठेवलेली लाकडे :'औटातून मी दोन मेढी काढल्या.' – आआशे ३२६. पहा : **अवट**

औट पु. उत्सवप्रसंगी करायच्या दारूकामातील एक प्रकार :'अचानक आकाशात औट उडाला. त्याच्या सप्तरंगी ठिणग्या उडाल्या.' – स्वामी ३८७.

औट, औटभर न. १. बैलांना त्रास न देता झालेले दिवसाचे नांगरटीचे काम; एक नांगरभर; खुटणभर. (क्रि. नांगरणे.) २. (ल.) एक शेत, वावर किंवा त्याची लांबी. (व.)

औटकी स्त्री. अवटी याचे काम, अधिकार, धंदा. पहा : **अवटकी**

औटकी स्त्री. उजळणीचा प्रकार; अवटकी; साडेतीनचे पाढे कोष्टक.

औट घटकांचा आनंद (साडेतीन घटकांचा म्हणजे) अल्पकाळ टिकणारे सुख, आनंद; क्षणभंगुर सुख.

औट घटकांचे राज्य, औट घटीचे, घडीचे राज्य (किरीटी रामराजाने आपल्या अबदागिऱ्याला साडेतीन घटका राज्य दिल्याच्या गोष्टीवरून अथवा शिराळशेटच्या गोष्टीवरून) थोडा वेळ मिळणारा अधिकार; सुख; पाण्यावरचा बुडबुडा; क्षणभंगुर अंमल.

औट घटकेचा थोडा वेळ टिकणारा; क्षणिक :'तुमच्या औट घटकेच्या लटक्या सुखासाठीं ..' – बंप ३१.

औटघडी वि. क्रिवि. अल्प काळचे; थोडा वेळ टिकणारे.

औटडे न. (साडेतीन हाताचे) शरीर :'बंदी बंदाची कौपीन। बहिरवास औटडें।।' – तुगा ४०२०.

औटपद, औटपीठ न. १. (योग.) द्विदल अग्निचक्रावरील एक स्थान; त्रिकूट, श्रीहट, गोल्हाट, औटपीठ ही महाकारणस्थाने. त्यांपैकी एक :'शोषूनि सहस्र दळाचे पाट। औटपीठ आणि गोल्हाट। क्रमोनिया श्रीहट। आली उद्धट ब्रम्हस्थाना।' – एभा ६.१२९. २. कोल्हापूर, तुळजापूर, मातापूर ही तीन व सप्तशृंग अर्धे, मिळून देवीची साडेतीन स्थाने :'नाना औटपीठें ओंकारें दर्शना आलीं।' – सप्र ५.१८.

औटमात्रा स्त्री. ओंकार; प्रणव.

औटहाऊस न. पडघर; पडशाळा; चाकर लोकांसाठी बांधलेली स्वतंत्र खोली. [इं.]

औटाण न. गैरवेळ; अवेळ; गैरहंगाम. [सं. अव +स्थान]

औटावी वि. १. औट (मात्रा) मधील अर्धी; ओंकाराच्या साडेतीन मात्रांपैकी शेवटची अर्धमात्रा :'देवा तूं अक्षर। औटावियें मात्रेसि पर।' – ज्ञा ११.३०७. २. माया; ब्रह्मस्वरूप. आउटाविए, आउठावे अशी रूपेही आढळतात :'आउटाविए पदीं आरोहण।' – तुगा ४०३५.

औटिक, औटीक वि.; क्रिवि. चमत्कारिक; कौतुकास्पद; नवल

वाटण्याजोगे (बोलणे).

औटी स्त्री. तासायच्या किंवा कापायच्या लाकडावर पाडलेली खूण.

औटी पु. वजनमापांवर देखरेख करणारा अधिकारी.

औटी, आवटी पु. १. सोनाराचा शिक्का. २. एक ग्रामाधिकारी. त्याच्याकडे गावात विक्रीसाठी येणारे धान्य मोजून घेण्याचा व त्याचप्रमाणे अधिकृत नियमाप्रमाणे बाजाराची मापे तपासण्याचा अधिकार असतो.

औठडे पहा : **औठे**

औठणे अक्रि. ओसरणे; ओहोटी लागणे. पहा : **ओहटणे**

औठा वि. साडेतीन :'औठां वरिखां : गोसावीयांचेया दर्शना गेले :' – लीचउ १८७.

औठाण व. गळू; टेंगूळ. पहा : **उठाणू**

औठी पहा : **ओहोटी**

औड पु. शेतकामाकरिता निश्चित केलेला एक तुकडा; आवड.

औड, औडभर पहा : **औट, औटभर**

औडक चौडक पु. लहान मुलांचा एक खेळ.

औडुव पु.(संगीत) (प्र.) औडव. पाच स्वर. संगीतातील एक राग.[सं.]

औडुवतान स्त्री. पाच स्वरांची तान.

औडुवत्व न. रागालापातील वर्ज्य दोन स्वर न येण्याची दक्षता ठेवणे.

औत पु. १. आहुती–आहुत (अप.) २. बली. ३. (ल.) अतिशय कष्टमय स्थिती; आसन्न मृत्यूची अवस्था. (व.) (वा.) **औत घेणे –** अति श्रम होणे; त्रास होणे; मरणोन्मुख होणे – स्थितीस येणे.

औत न. पु. १. आऊत; शेतकी वगैरे धंद्याचे साधन. सामान्यतः नांगर, कुळव, पाभर इ. जी बैलांनी फिरवायची साधने त्यांना औत म्हणतात :'जे कर्ता जीव विंदाणीं । काढूनि पांचही खाणी । घडित आहे करणीं आउतीं दाहे ।' – ज्ञा १८.४५४. २. एका नागराने नांगरली जाईल इतकी जमीन. सुमारे ८० बिघे. ३. शेतकामाच्या बैलांची एक जोडी. (व.) ४. भंडाऱ्याचा माडाची पोय कापण्याचा कोयता. (कों.) ५. साधन; हत्यार (सोनार, कासार, कुंभार इ. धंद्याला लागणारे); आयुध; शस्त्र. ६. सूप, टोपली, रोवळी, पंखा इ. बांबूच्या वस्तू. प्रभु जातीत वरातीच्या वेळी बांबूच्या हातरीवर वरीलपैकी जे साहित्य ठेवतात त्याला औत म्हणतात. (राजा.) ७. मासे पकडण्याचे जाळे; आवत. आऊत असाही प्रयोग आढळतो. [सं. आयुध, आ+युत=जोडला जाणारा] (वा.) **औत चालणे –** नांगर चालू असणे. **औत धरणे** – शेतकाम चालू करणे. **औत भरणे –** शेतकीची हत्यारे साफसूफ, तयार करून ठेवणे. **औत सुटणे, औत पडणे** – काम बंद करणे.

औतकरी पु. नांगर धरणारा; शेतकरी; औत्या.

औतकाठी स्त्री. (सामा.) औत; शेतकीची हत्यारे.

औतकी स्त्री. प्रत्येक नांगरामागे ठराविक धान्य मिळण्याचा पाटलाचा हक्क.

औतपट्टी स्त्री. १. प्रत्येक नांगरावरील सरकारी कर. नांगऱ्यावरही असा जादा कर बसवीत. २. ताडाच्या तोडणीच्या प्रत्येक कोयत्यावरील कर.

औतपादीक वि. उपटसुंभ; आकस्मित.

औतबंदी स्त्री. प्रत्येक नांगरावर कर बसविण्याची पद्धत; नांगरबंदी. खानदेशात याला 'ओटबंदी' म्हणतात.

औतभरणा पु. (समुच्चयाने) १. शेतकरी वर्ग. २. शेतकीची हत्यारे. ३. नांगरावरील सरकारी कर. पहा : **औतपट्टी**

औतून कज्जा आणणे, औतून कटकट करणे भांडण उकरून काढणे; भांडणाला आमंत्रण देणे.

औते न. अंबाडी, ताग, केतकी यांचा एक इंच पेराचा दोर. (खान.)

औत्पातिक वि.अशुभ; अमंगलसूचक; पीडादायक. [सं.]

औत्पादिक वि. आकस्मिक; उपटसुंभ :'ग्रंट डफचाच इतिहास वाचणाऱ्या गृहस्थांस मराठ्यांचा अभ्युदय हा केवळ औत्पादिक वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुतः तो तसा नाही.' – लोटिकेले २.२२९. [सं.]

औत्या पु. १. शेतकरी; नांगर धरणारा; नांगऱ्या; आवत्या. २. (ल.) औत धरण्याच्या वयाचा पुरुष. ३. चाकर; सालदार; आवत्या (खान.): 'बिहीरांहीं आवत्यो रिईने तो आखे तो काम केवां.' = दुसऱ्याच्या येथे चाकर राहून तो सांगेल ते काम करावे.' – भि ३५.

औत्सर्गिक वि. सर्वसाधारण; विशिष्ट नाही असा; निश्चित निर्देश केला नाही असा. [सं.]

औत्सुक्य न. उत्सुकता; उत्कंठा; धाधावणे; उतावीळपणा : 'विविधा औत्सुक्यांची दाटी ।' – ज्ञा १८.१५५६. [सं.]

औदक वि. पाण्यातील जंजिरा; पाणकिल्ला; जलदुर्ग. [सं.]

औदरिक, औदर्य वि. १. पोटातला; पोटासंबधीचा; आतड्यासंबंधीचा. २.खादाडखाऊ, आधाशी. [सं.]

औदर्य वि. पु. पुत्र, मुलगा.

औदंबर, औदंबरी पहा : **ओडंबर, ओडंबरी**

औदार्य न. दातृत्व; दानशीलता : 'तैसा औदार्याचा कुरुठा ।' – ज्ञा ५.१२. [सं.]

औदासीन्य न. १. उदासीनपणा; निरानंदावस्था; सुखाचा अभाव. २. बेफिकिरी; अलिप्तपणा; निष्काळजीपणा; तटस्थपणा. [सं.]

औदास्य न. १. पहा : **औदासीन्य** २. अंतर, अंतराय : 'ऐसें दोघां औदास्य पडिले' – इप्र. १६.१३

औदांडो, औधांडो पु. १. मोठा जोराचा वादळी पाऊस व वारा. २. मोठा पूर.
वि. अतिद्वाड; उर्मट; हालमस्त. [सं. अव+दण्ड]

औदी घालणे सक्रि. बुडविणे; लुबाडणे; पुरा नक्षा उतरवणे : 'तिपान्ना म्हणाला, 'काय न्हाई त्यालाच औदी घालायचा.' – भेटी ४४.

औदुंबर पु. (प्र.) उदुंबर, औदुंबराचे झाड; उंबर;
वि. उंबराविषयी, उंबराचे (काष्ठ, पर्ण, पुष्प इ.) [सं. उदुंबर]

औदुंबर न. तांबे : 'औदुंबर सुवर्ण रजत । काष्ठाचेही असे पवित्र । ऐसें असे निर्मळपात्र । वामहस्तीं उदक बरवें ।।' गुच – ३६.२७७ [सं.]

औंदुबर पु. वानप्रस्थविशेष. सकाळी उठल्या बरोबर ज्या दिशेला पाहिल, त्या दिशेकडील फळे इ. वर राहणारा.

औदुंबरपंचमी स्त्री. माघ वद्य पंचमी.

औदुंबरी माळ स्त्री. उंबराची माळ (अठांगुळाच्या वेळेस स्त्रीच्या गळ्यात घालतात. ही एक लोकरूढी आहे.) : 'औदुंबरी माळ गळां न घाली' – सारुह २.३५.

औद्धत्य न.उद्धटपणा; दांडगेपणा; वरचढपणा : 'तैसें मौढ्य घणावे । औद्धत्य उंचावे ।' – ज्ञा १६.३९१ [सं.]

औद्धारिक वि. १. उद्धारासंबंधीचा २. दायभागासंबंधीचा.
न. हिस्सा.

औद्योगिक वि. १. उद्योगासंबंधी; कारखाने, उत्पादनाचे मोठे धंदे यासंबंधीचा; यंत्राचा उपयोग करून होणाऱ्या उत्पादनसंबंधीचा.

औद्योगिक अरिष्ट न.(अर्थ) १. संप,, टाळेबंदी, कच्चा माल आणि ऊर्जा यांचा अभाव किंवा अतिअनिश्चित पुरवठा यामुळे उद्योगधंद्यामध्ये निर्माण झालेली आणिबाणीची स्थिती. २. चलनवाढ, किंमतवाढ, मागणीचा अभाव, बेरोजगारी यामुळे उद्योगधंद्यावर येणारी संकटे.

औद्योगिक कर्षित्र न. (यंत्र.) कारखानदारीत ओझी इकडून तिकडे वाहण्यासाठी उपयोगात येणारे वाहन; ट्रक्टर.

औद्योगिक क्रांति–ती स्त्री. (अर्थ.) विज्ञान, तंत्रज्ञान यांमुळे उत्पादनपद्धतीत बदल होऊन अर्थव्यवस्थेत झालेले परिवर्तन.

औद्योगिक तंटा (अर्थ.) औद्योगिक क्षेत्रात, एखाद्या उद्योगसंस्थेमध्ये व्यवस्थापन, सेवकवर्ग आणि कामगार संघटना यांच्यामध्ये निर्माण झालेले मतभेद, तंटे, संघर्ष इत्यादी.

औद्योगिक न्यायाधिकरण, न्यायालय उद्योगधंद्यातील तंटे वगैरे सोडवण्यासाठी शासनाने नेमलेले न्यायमंडळ.

औद्योगिक पुरातत्त्व न. (पुरा.) आदिमानवाने केलेल्या दगडी आयुधांच्या निर्मितिपद्धतीवरून आणि त्यांच्या वर्गीकरणांवरून केलेली अनुमाने.

औद्योगिक प्रशिक्षण उद्योगधंद्यांना उपयोगी पडावे यासाठी देण्यात येणारे विशेष शिक्षण; व्यावसायिक शिक्षण.

औद्योगिक मंदी (अर्थ.) औद्योगिक उत्पादनांना मागणी कमी होत गेल्याने किंवा मागणी नसल्याने निर्माण झालेली स्थिती.

औद्योगिक मानसशास्त्र औद्योगिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी उपयोगात आणलेले मानसशास्त्राचे प्रायोगिक ज्ञान, तत्त्वे.

औद्योगिक लोकशाही (अर्थ.) उद्योगाच्या संचालनात कामगारवर्गाला सहभाग देऊन निर्णय घेण्याची पद्धती.

औद्योगिक वसाहत उद्योगधंद्यांच्या, कारखान्यांच्या उभारणीसाठी राखून ठेवलेली स्वतंत्र जागा, ठिकाण.

औद्योगिक शिक्षण उद्योगधंद्याविषयी ज्ञान देणारे शिक्षण : 'औद्योगिक शिक्षण घेणे हा राष्ट्रभक्तीचा पहिला पाठ आहे.' – के १६–४–३०.

औद्योगिक समाजजीवन (अर्थ.) मोठ्या प्रमाणावर झालेल्या औद्योगीकरणामुळे समाजजीवनावर झालेला परिणाम; अशा परिणामामुळे बदललेल्या समाजजीवनाचे विश्लेषण, अभ्यास वगैरे.

औद्योगिक समाजशास्त्र औद्योगिक प्रभावाखाली असणाऱ्या आणि उद्योगधंद्यांनी नियमित केलेल्या सामाजिक संबंधाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करणारी समाजशास्त्राची एक शाखा.

औद्योगिक संबंध (अर्थ.) उद्योगधंद्यात मालक, चालक, सेवक आणि कामगार संघटना यांच्यातील परस्परसंबंध.

औद्योगीकरण (अर्थ.) देशामध्ये मूलभूत, पायाभूत उद्योगांची उभारणी करून त्यातून लहानमोठ्या उद्योगधंद्यांचा विस्तार करणे.

औधत्य न. उद्धटपणा.

औधिया स्त्री. चोऱ्या करणारी बैराग्यांची एक जात. त्या जातीतील माणूस.

औपचारिक वि. १. उपचाराविषयीचा २. ओढूनताणून; कसातरी; तोंडदेखला; वरवरचा; शिष्टाचार म्हणून पाळलेला :'सर्व व्यवहार औपचारिक चालला होता, त्यांत प्रेम राहिले नव्हतें.'–इंप ४२.३. अलंकारिक; रूपकात्मक. ४. खुशामतीचे; प्रशंसात्मक; (भाषण).[सं.]

औपचारिक प्रस्ताव रीतसर, नियमानुसार, मांडलेला प्रस्ताव, सूचना.

औपनिवेशिक स्वराज्य वसाहतीचे स्वराज्य.

औपपत्तिक वि. तात्त्विक विचारांवर भर देणारे; प्रत्यक्ष कार्यावर भर नसलेले; उपपत्तीविषयक. [सं.]

औपम्य न. सादृश्य; तुल्यता; सारखेपणा. [सं.]

औपरोधिक वि. उपरोधयुक्त; लागेल, वर्मी लागेल, झोंबेल असे (भाषण); ज्यातील खरा अर्थ गर्भित असून शब्दार्थ किंवा वाच्यार्थ निराळा असतो असे बोलणे, भाषण इ. शालजोडीतील (मारणे.) [सं.]

औपसर्गिक वि. १. शकुनासंबंधाचा. २. अशुभसूचक. ३. रोगपरिणामरूप.
पु. कफवातदिकांचा प्रकोप.

औपाधिक वि. उपाधीसंबंधी; उपाधी जडलेला; मायिक : 'दाविजे तेवीं औपाधिका । बोली इया ।।'' – ज्ञा १५.४७०. [सं.]

औपासन पु. स्मार्ताग्नी किंवा गृह्याग्नि; विवाहामध्ये 'गृहप्रवेशनीय' होम होतो तो अग्नी. हा अग्नी आमरणान्त संरक्षण करायचा असतो व यावर सकाळ–संध्याकाळ हवन करायचे असते. 'सांडोनि वैश्वदेव औपासन । सदा भक्षिती परान्न ।।'' – कथा ४.१६.३६ [सं.]

और पु. न. १. ऊर, ओर; नदीचा पूर : 'पुनर्वसु – पुष्यात औरावर औरे आली. ' – आआशे १६८. २. खाडीत किंवा नदीच्या पात्रात आलेली समुद्राची भरती. [सं.आ.+पूर]

और वि. १. अन्य; दुसरा; तद्भिन्न. २. विलक्षण; विचित्र; मजेदार; अजब. ३. छान; सुंदर.
क्रिवि. आणखी; शिवाय. [हिं.]

औरत स्त्री. स्त्री; पत्नी. [फा.]

औरस पु. धर्मविधीने लग्न लावलेल्या स्त्रीला स्वतःपासून झालेला पुत्र; स्त्रीच्या ठायी स्ववीर्याने उत्पन्न झालेले अपत्य; अस्सल. दत्तकाच्या उलट : 'गांधारि उगीच रहा. होऊं दे द्यूत औरसा मान्य ।' –मोसभा ६.८७
वि. १. छातीसंबंधी. २. स्वीय; अस्सल. ३. पराक्रमी. [सं. उरस्]

औरस स्त्री. (चुकीने) लग्नाची बायको; पाटाची नव्हे.

औरसचौरस क्रिवि. १. सभोवार; चोहोकडे; चारी बाजूंना; आसपास; २. लांबीरुंदीने; उभेआडवे (क्षेत्रादिकांचे प्रमाण) ; लांबीने रुंदीला गुणून; आडवातिडवा : 'औरसचौरस दोन हात लांब रुंद जागेत.... – काच ९१. [चौरसचे द्वि.]

औरस पुत्र पु. विवाहित स्त्रीपुरुषाची संतती; धर्मपत्नीपासून स्वतःला

झालेला पुत्र. पहा : **औरस** [सं. उरस्]

औरंग न. सिंहासन; तख्त. [फा.]

औरंग न. व्यापारी जिन्नस तयार होण्याचे किंवा एकाच मोठ्या प्रमाणात असण्याचे व निर्माण होण्याचे ठिकाण. ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारात वखारींना हा शब्द लावीत असत. [हिं.]

और्ध्वदेहिक न. (प्रेताविषयीचे) उत्तरकार्य; क्रियाकर्म; प्रेतसंस्कार.
वि. उत्तरक्रियेसंबंधी. [सं.]

और्व वि. मांडीचे
पु. वडवानल. [सं.]

औलाद स्त्री. १. संतती; संतान; प्रजा. २. वंश; कुळी : 'सरकार, कुत्र चांगल्या औलादीचं हाय.' – व्यंमाक ५. [फा.]

औलाद स्त्री. कटकट; पीडा.

औलियाई वि. उच्च. [फा.]

औशी क्रिवि. संध्याकाळी :'दळणाचं टोपलं औशी झोपतानाच जात्यापाशी ठेवलं होतं.' – सीए ३२.

औषध न. १. रोगनिवारण करणारा पदार्थ; ओखद; दवा; ज्याच्या सेवनाने रोगनिवृत्ती होते असा झाडपाला, मुळी, काष्ठ, धातू, रस, रसायन, मात्रा इ. २. (ल.) कार्यसिद्धीचे साधन; उपाय; इलाज. ३. दारू (शोभेची – बाराची) :'हवाया नळे भरभराटे। औशधकळा गाजली।।' – वेसीस्व ७.८८. ४. (संकेताने) सोमल, अफू इत्यादी अंमली पदार्थ. [सं.] (वा.) **औषध करणे –** औषध लावणे, घेणे; उपाययोजना करणे. **औषधाला नसणे –** औषधापुरतेही नसणे; संपुष्टात येणे; मुळीच नसणे; अत्यंत अभाव असणे. **औषधावाचून खोकला जाणे –** अनायासे ब्याद टळणे.

औषधपत्र न. डॉक्टरांनी रोग्यासाठी लिहून दिलेला औषधयोजनेचा कागद.

औषधपाणी न. औषध; औषधउपचार; उपाययोजना (व्यापकपणे). (क्रि. देणे, घेणे, करणे).

औषधपेटी स्त्री. औषधे ठेवण्यासाठी वेगवेगळे कप्पे केलेली पेटी.

औषधालय न. औषधे मिळण्याचे ठिकाण, दुकान.

औषधि–धी स्त्री.१. फळे पिकेपर्यंत जी झाडे जगतात ती; एक हंगाम जगणारी झाडे. २. (सामा.) झाड; वनस्पती; जडीबुटी.
वि. औषधासंबंधी; गुणकारी; औषधाला उपयोगी. [सं. औषधि]

औषधिद्रव्य न. (वै.) औषधनिर्मितीसाठी वापरली जाणारी द्रव्ये.[सं.]

औषधी क्रियाविज्ञान न. (वै.) वनस्पतीपासून उपलब्ध झालेल्या औषधिद्रव्यांच्या, शरीरावर होणाऱ्या परिणामांची (प्रभावाची) माहिती देणारी विज्ञानशाखा.

औषधी द्रव्य औषध युक्त किंवा औषधाची वस्तू, पदार्थ.

औषधी द्रावण औषधी पाणी; जखम धुण्याचे द्रावण.

औषधी शास्त्र वनस्पतीत कोणते औषधी गुणधर्म आहेत ह्याचा विचार करणारे शास्त्र.

औषधोपचार, औषधोपाय पु. रोगावर औषधयोजना; दवा.

औष्णिक वि. उष्णतेसंबंधी; उष्णतेवर अवलंबून असणारी. [सं.]

औष्णिक एकक (शाप.) उष्णता मोजण्यासाठी किंवा दोन उष्णतामानांची तुलना करण्यासाठी वापरलेले माप. उदा. सेल्सिअस.

औष्णिक केंद्र उष्णता निर्माण करणारे केंद्र; ज्या ठिकाणी उष्णता उत्पन्न होते असे केंद्र. [सं.]

औष्णिक विद्युत दगडी कोळशासारख्या पदार्थापासून उष्णता मिळवून तयार करण्यात येणारी वीज; उष्णतेपासून मिळवलेली वीज.

औष्णिक विद्युतकेंद्र कोळसा जाळून त्या उष्णतेपासून पाण्याच्या वाफेच्या साहाय्याने जनित्र फिरवून वीज निर्माण करणारे केंद्र.

औष्णिक विश्लेषण (रसा.) उष्णता एकदम बाहेर टाकल्यामुळे किंवा शोषून घेतल्यामुळे मूलद्रव्याच्या घटकांत होणारा रासायनिक बदल.

औष्णिकगतिकीशास्त्र न. (भौ.) वस्तूच्या अस्तित्वाचे उष्णता आणि शक्ती यांच्याशी असलेले समीकरण मांडणारे शास्त्र. उदा. तपमान, दाब आणि कार्य यांचा परस्परांशी असलेल्या संबंधाचा वस्तूच्या कार्यावरील परिणाम.

औसत वि. मधील; सरासरी. [फा.]

औसा पु. तात्पुरती झोपडी :'कलिंगडे पिकायला लागल्यापासून मला साखरपट्टीत औसा घालून राहणे भाग पडले होते.' – आआशे ३४९.

औसा पु. पुजारी. [सं. उप+आस्]

औसाफ पु. १. लौकिक; कीर्ती :'परशुरामपंत यांस छत्रपतींनीं मारविलें सबब विश्वासराव यास मारिले ही गोष्ट बेहिशेबाची, आमचे घराण्याचे औसाफास योग्य न जाले.' –ऐलेसं ११.६१२५. २. गुण; लायकी. [फा.]

औसिकम पु. हरणाच्या रंगाचा घोडा. – अश्वप १.१०४.

औक्ष न. आयुष्य; जीवित; जीवनमर्यादा. [सं. आयुष्य]

औक्षण, औक्षवण न. आरती ओवाळणे; आरती वगैरे ठेवलेले तबक किंवा लामणदिवा; लग्नकार्याच्या अथवा इतर शुभप्रसंगी देवाची मूर्ती किंवा ज्याचे मंगलकार्य असेल त्याला सुवासिनीने ओवाळण्यासाठी घेतलेले दीपादियुक्त ताम्हन.(सामा.) ओवाळणे. पहा: **अक्षवाण** :' त्यांचें सुवासिनी स्त्रियांकडून औक्षण होते.' – ऐरापुविवि २६. (क्रि करणे.) आयुष्यवर्धक विधी. [सं. आयुष्य+वान्]

औक्षवंत, औक्षवान वि. चिरायू; चिरंजीव; आयुष्यमान; दीर्घायुषी; उदंड आयुष्याचा.(कुण. बायकी) [सं. आयुष्यवंत, आयुष्यवान्]

औंजार पु. उपद्व्याप. (गो.)

औंदा क्रिवि. यंदा; ह्या वर्षी; चालू साली :'औंदा सुटला पायजे सातवीतनं.' – मिरास ५२. (कुण.) [फा. आयंदा]

औंध स्त्री. काळोखी; अंधारी. पहा : **ओंध.** [सं. अंध]

औंस पु. अडीच तोळे. १ औंस = २ जेवणाचे चमचे (टेबलस्पून). २. औंस = दारूचा एक पेला (वाइन ग्लास). [इं.]

औंस पु. विभाग :'हे कठिण पांच औंस.' – वह ६.२५. [सं. अंश]